स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

आंतरविद्याशाखीय समाजकार्य विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाच्या संशोधन प्रबंधाची रूपरेषा

-:संशोधन विषय:-

आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजात सामाजिक आर्थिक बदलांचा अभ्यास
(विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा)

-:संशोधक:-

राजेश भाऊराव झगडे
(एम.एस.डब्ल्यू.नेट,सेट)
सामाजिक शास्त्रे संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

-:मार्गदर्शक:-

डॉ. अरविंद सुदाम लोणकर
(एम.एस.डब्ल्यू.नेट, पीएच.डी,डी.बी.एम.)
एम.ए.पब्लिक ॲडमिनीस्ट्रेशन, सहा.प्रा.व
संशोधन मार्गदर्शक अखिल सर समाजकार्य
महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

जानेवारी - २०२४

आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजात सामाजिक आर्थिक बदलांचा अभ्यास

(विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा)

प्रस्तावनाः-

भारतीय समाज रचना अनेक घटकांवर आधारीत आहे. भारतामध्ये प्राचीन काळापासून वंश, पंथ, संस्कृती ईत्यादी बाबतीत विविधता आढळते. प्राचिन काळापासून भारतीय समाज रचनेत आर्यांनी वर्ण व्यवस्था निर्माण केली. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र या चार वर्णांवर भारतीय समाजाची जडण-घडण दिसून येते. वर्ण व्यवस्थेनुसार भारतीय समाज रचना अशी निर्माण झाली की, ब्राम्हण असेल, तर १००% शिक्षणाची मक्तेदारी त्यांची, क्षेत्रीय असेल १००% संरक्षणाची मक्तेदारी, वैश्य या वर्णाची शेती व्यवसाय ईत्यादी बाबतीत १००% मक्तेदारी होती. शुद्र या वर्णातील लोकांनी वरील तीन्ही वर्णाच्या लोकांची गुलामी करणे, जसे की, मेलेली जनावरे, त्या लोकांची मैला उचलणे, अमाणुष छळ करणारी कामे या वर्णाकडे होती. भारतीय समाज व्यवस्थेत वर्षानुवर्ष शुद्रांचा छळ झाला. त्यांची घरे गावाच्या बाहेर असायची, सामाजिक विकासा पासून ते फार दुर होते. प्राचीन काळापासून वर्ण व्यवस्था वर्चस्ववादी होती. (आंबेडकर,१९१६, पेज नं. १९)

भारतावर अनेक आक्रमण झाले. बाबर, मुघल या शासकांनी भारतीय समाज व्यवस्थेत कोणताही बदल न करता, केवळ आर्थिक लूटमार करणे आणि आपली मुस्लीम साम्राज्य वाढविणे यावरच भर दिला. शुद्रांनी वरील शासकांच्या विरोधात काही प्रमाणात बंड करण्याच्या प्रयत्न केला. मुघल काळात विविध संघटनांनी त्यांचा प्रखर विरोध केला. (सोमवंशी २०२१ पेज नं. ३६)

यानंतर ब्रिटीश भारतात आले. त्यांनी येथील भारतीय समाज रचनेत असलेली विविधता ओळखून त्यांनी आपले साम्राज्य विस्तारण्यास सुरूवात केली. ब्रिटीशांनी भारतीय समाजरचनेतील शुद्र म्हणून गणल्या जाणा-या वर्णाच्या लोकांना त्यांच्या सैन्यात भरती करून घेतले त्यामुळे अनेक शुद्र समाजातील लोकांनी ब्रिटीश सैन्यात भाग घेतला. ब्रिटीश काळा पासूनच ख-या अर्थाने भारतीय समाज रचनेत बदल झाल्याचे दिसून येते.

भारतीय समाजसुधारक आपल्या समाज व्यवस्थेमध्ये पोकळी आहे हे जाणुन होते. त्यात महात्मा ज्योतीबा फुले यांनी भारतात शिक्षणाची सुरूवात केली. त्यांनी शुद्रांच्या मुला-मुलींनी

शिक्षणाची दारे खुली केली. इ.स. १८८२ मध्ये त्यांनी प्रथम हंटर कमीशन पुढे भारतीय समाज रचनेतील शुद्रांना विशेष शिक्षणाची सवलत असावी अशी मागणी केली.

राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या करवीर संस्थानात अस्पृशांना (शुद्रांना) नौकरी मध्ये ५०% आरक्षण म्हणून २६ जूलै १९०२ मध्ये आदेश जारी केला. त्यांनी अस्पृशांना राजकीय सवलती असायला हव्या म्हणून त्यांच्या संस्थानातील निवडणुक प्रक्रियेत जागा आरक्षीत ठेवल्या. अस्पृश्य म्हणून गणल्या जाणा-या जाती महार, मांग, चांभार, तेली, ढोर, कोळी, माळी अशा अनेक जातीं साठी त्यांनी निर्णय देखील घेतला. त्यांनी आपल्या संस्थानातील नगरपरिषदेचा मुख्य म्हणुन चांभार व्यक्तीची निवड केली होती. येवढी प्रगल्भ दुरदृष्टी होती. या निर्णयामुळे वर्ण व्यवस्थेतील स्वतःला सवर्ण मानणा-या जाती याला विरोध करीत होत्या. तरी देखील राजर्षी शाहू महाराज आपल्या निर्णयावर ठाम राहून आदेश जारी केले. ब्रिटीश कालखंडातील स्वातंत्र्यापूर्वी त्यांना आरक्षण धोरणाचे प्रवर्तक म्हटल्या जाते. (माने, २००९ पेज नं. ३३)

आरक्षणाची व्याख्याः-

आरक्षण ही इंग्रजांच्या राजवटीत निर्माण झालेली सकारात्मक कृतीची व्यवस्था आहे. हे ऐतीहासिकदृष्ट्या वंचीत गटांना शिक्षण, रोजगार, सरकारी योजना, शिक्षण शिष्यवृत्ती आणि राजकारणात पर्याप्त प्रतिनिधीत्व प्रदान करते.

आरक्षणाची ऐतिहासिक वाटचालः-

मागासवर्गीयांसाठी (बी.सी.) आरक्षणाची सुरूवात विंध्याच्या दक्षिणेकडील प्रेसिडेंसी क्षेत्र आणी संस्थानांच्या मोठ्या भागात स्वातंत्र्याच्या खुप आधि पासून झाली. महाराष्ट्रातील कोल्हापूरचे महाराज छत्रपती शाहू यांनी १९०२ मध्ये मागासवर्गीयांची गरीबी दुर करण्यासाठी आणि त्यांना राज्य प्रशासनात वाटा देण्यासाठी आरक्षण सुरू केले. कोल्यापूर राज्यातील मागासवर्गीय/समाजांना नौक-यांमध्ये आरक्षण देण्यासाठी १९०२ ची अधिसूचना जारी करण्यात आली. ही अधिसुचना भारतातील नैराश्यग्रस्त वर्गाच्या कल्याणासाठी आरक्षण देणारा पहिला सरकारी आदेश आहे. (संजीव, २०२३ पेज नं. ३४)

अस्पृशता ही संकल्पना देशभरात सारखीच पाळली जात नव्हती. त्यामुळे उदासीन वर्ग ओळखणे सोपे काम नव्हते. शिवाय पृथक्करण आणि अस्पृश्यतेची प्रथा भारताच्या दक्षिणेकडील भागात अधिक प्रचलीत राहिली आणि उत्तर भारतात ती अधिक व्यापक होती. एक अतिरीक्त गुंतागुंत अशी आहे की, काही जाती/समाज एका प्रांतात अस्पृश्य मानले जातात. परंतू इतर प्रांतात नाही. पारंपारिक व्यवसायांच्या आधारावर काही जातींना हिंदू आणि बिगर हिंदू अशा दोन्ही समुदायांमध्ये स्थान आहे. जातींच्या यादीतला मोठा इतिहास आहे. जो आपल्या इतिहासाच्या सुरूवातीच्या काळापासून मनू पासून सुरू होता, मध्ययुगीन कालखंडात देशाच्या विविध भागात असलेल्या समुदायाचे वर्णन समाविष्ट आहे. ब्रिटीश/निविषक काळात सन १८०६ नंतर मोठ्या प्रमाणात यादी तयार करण्यात आली. सन १८८१ ते १९३१ च्या जणगनणेच्या काळात या प्रक्रियेला गती मिळाली.

मागासवर्गीयांच्या चळवळीलाही प्रथम दक्षिण भारतात विशेषतः तामिळनाडूध्ये वेग आला. देशातील काही समाजसुधारकांच्या सततच्या प्रयत्नांमुळे उच्च वर्गाने स्वतःमध्ये आणि अस्पृश्यांमध्ये बांधलेली भिंत पूर्णपणे कोसळली. त्या समाजसुधारकांमध्ये रेत्तमलई श्रीनिवास पेरियार, आयोथीदास पंडीत, ज्योतीबा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतरांचा समावेश आहे.

जाती व्यवस्था नावाच्या सामाजिक वर्गिकरणाच्या शतकानुशतके चालत आलेल्या प्रथेचा परिणाम म्हणून भारत असंख्य अंतर विवाह गटामध्ये किंवा जाती आणि उपजातींमध्ये विभागला गेला आहे. आरक्षण धोरणाच्या समर्थकांचे म्हणने आहे की, पारंपारिकपणे प्रचलित जातव्यवस्थेमध्ये खालच्या जातीसाठी तीव्र अत्याचार आणि अलगाव आहे आणि त्यांचे शिक्षणासह विविध प्रकारचे स्वातंत्र्य मर्यादित आहे. "मनुस्मृती" सारख्या प्राचीन ग्रंथानुसार जात हा वर्णाश्रम धर्म आहे. ज्याचा अर्थ वर्ग किंवा व्यवसायानुसार दिलेली पदे असा आहे. वर्णाश्रम (वर्ण + आश्रम) च्या वर्ण शब्दाचा रंग या सामानार्थी शब्दाशी घोळ होवू नये. भारतातील जाती व्यवस्थेने हा नियम पाळला.

१८८२- हंटर कमीशन नेमण्यात आले. महात्मा ज्योतीबा फुले यांनी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणा बरोबरच सरकारी नौक-यांमध्ये आरक्षण प्रतिनिधीत्वाची मागणी केली.

१८९१- त्रावणकोरच्या सरंजामी संस्थानात सन १८९१ च्या सुरूवातीला सरकारी नौक-यांमध्ये आरक्षणाची मागणी सार्वजनिक सेवेत पात्र मुळ रहिवाशांना दुर्लक्षीत करून परदेशी भरतीच्या विरोधात निदर्शने करण्यात आली.

१९०२- शाहू महाराजांनी महाराष्ट्रातील सरंजामशाही संस्थान, कोल्हापूरात आरक्षणाची सुरूवात केली. बडौदा आणि म्हैसूर या सरंजामशाहीत संस्थानांमध्ये आरक्षण अगोदरच लागू होते.

१९०८- इंग्रजांनी अनेक जाती आणि समुदायांच्या बाजूने आरक्षण लागू केले. ज्याचा प्रशासनात फारसा वाटा नव्हता.

१९०९- भारत सरकार कायदा १९०९ मध्ये आरक्षणाची तरतूद करण्यात आली.

१९१९- माँटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा सुरू झाल्या.

१९१९- भारत सरकार कायदा १९१९ मध्ये आरक्षणाची तरतूद करण्यात आली.

१९२१- मद्रास प्रेसिडेंसीने जात शासनाचा अध्यादेश जारी केला. ज्यामध्ये ब्राम्हणेत्तरांसाठी ४४ टक्के ब्राम्हणांसाठी १६ टक्के, मुस्लीमांसाठी १६ टक्के, इंडो/एंग्लो ख्रिश्चनांसाठी १६ टक्के आणि अनुसूचित जातींसाठी ८ टक्के आरक्षण देण्यात आले.

१९३५- भारतीय काँग्रेसने पुणे करार नावाचा ठराव संमत केला. ज्यामध्ये दलित वर्गासाठी स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले.

१९३५- भारत सरकार कायदा, १९३५ मध्ये आरक्षणाची तरतूद करण्यात आली.

१९४२-डॉ. बी. आर. आंबेडकर, यांनी अनुसूचित जातींच्या प्रगतीला पाठींबा देण्यासाठी ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेल फेडरेशनची स्थापना केली. त्यांनी सरकारी सेवा आणि शिक्षणात अनुसूचित जातींना आरक्षण देण्याची मागणी केली.

आरक्षण धोरणः-

भारत स्वातंत्र्याच्या आगोदर ब्रिटीश राजवटीच्या काळातील देखील हि संकल्पना मांडण्याचे धाडस सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांनी सन १८८२ हंटर कमीशनपुढे भारतीय समाजातील मागासलेल्या समाजाला मोफत आणि सक्तीच्या शिक्षणा बरोबरच सरकारी नौक-यांमध्ये मागासलेल्या समाजाला प्रतिनिधीत्व देण्याची त्यांनी प्रथम मागणी केली. शाहू महाराजांनी आपल्या

करवीर संस्थानात आरक्षणाची सुरूवात केली. समाजात श्रीमंत, गरीब, अती गरीब जे असे लोक असे की, सामाजजिक विकासापासून खूप दुर आहेत, त्यांच्यासाठी विशेष सवलत असायला हवी. म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात सन १९०२ मध्ये मागासलेल्या समाजांना नौक-यांमध्ये आरक्षण लागू असेल असे आदेश त्यांनी आपल्या संस्थानात काढले. भारतातील मागासलेल्या आणि समाजाच्या प्रवाहा बाहेर असलेल्या लोकांसाठी हा आदेश फायद्याचा ठरला. भारत स्वतंत्र झाल्या नंतर भारताच्या राज्य घटनेच्या मसूदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निवड करण्यात आली. भारतीय संविधानात देखील मागासलेल्या समाजासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली. वेगवेगळ्या मागास प्रवर्गांसाठी आरक्षणाची टक्केवारी निश्चित करण्यात आली.

भारतीय संविधानाने केवळ धर्म, वंश, जात, लिंग आणि जन्म स्थान या आधारावर भेदभाव करण्यास मनाई केली आहे. त्याऐवजी सर्व नागरीकांना समान संधी देवून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय किंवा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या प्रगतीसाठी राज्यघटनेत कलम १५-धर्म वंश जात लिंग जन्मस्थान या कारणास्तव मनाई. कलम-१६, सार्वजनिक सेवा योजनांच्या बाबींमध्ये समान संधी, कलम ४६- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन, कलम३३०- लोकसभेत अनुसूचित जाती व जमातींसाठी राखीव जागा, कलम-३३२ राज्यांच्या विधानसभेत राखीव जाता, कलम- ३३५, सेवा व पदे यावर अनुसूचित जाती व जमाती चे हक्क, कलम- ३३८, अनुसूचित जाती राष्ट्रिय आयोग, कलम- ३३८ (ख), राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग, कलम-३४१, अनुसूचित जाती तसेच कलम-३४२ (क) सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला वर्ग या सर्व महत्वांच्या कलमांचा समावेश भारतीय राज्यघटनेत केलेला आणि भारतीय राज्यघटना देखील आरक्षण धोरण या संकल्पनेचा मागासलेल्या समाजासाठी त्यांना विशेष सवलती असायला हव्यात, हे मान्य करते. (आंबेडकर, २०२२ पेज नं. ३, ५, ११, १२)

संविधानिक आरक्षणाची व्याख्या:-

"विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित असणा-या घटकांना इतर सशक्त समाजांच्या बरोबरीने आणण्यासाठी त्यांना कायद्याने देवू केलेली, विशेष संधी म्हणजे आरक्षण होय".

संशोधनाची व्याप्तीः-

आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजात सामाजिक आर्थिक बदलांचा अभ्यास हा विषय अभ्यासण्यासाठी काही मर्यादा आहेत. हे संशोधन कार्य फक्त नांदेड जिल्ह्या पुरते व त्या अंतरर्गत येणा-या तालुक्यां पुरते मर्यादित आहे. बौध्द समाजात आरक्षण धोरणामुळे सामाजिक आर्थिक बदल झालेत किंवा नाही. हे अभ्यासण्यासाठी हा विषय निवडला. आरक्षण या विषयावर कमी अधिक संशोधन झाले आहे. परंतू एका विशिष्ट समाजावर संशोधन कार्य झाले नाही. यास्तव नांदेड जिल्हा हे अध्ययनाचे क्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहे.

विषय निवडीचे कारणः-

संशोधनाची जिज्ञासू वृत्ती ही कोणताही संशोधन विषय निवडण्याचे मुख्य कारण आहे. समाजकार्याचा अभ्यास करित असतांना समाजातील विविध समस्यांचे आकलन होत असते. त्यामुळे एखाद्या सामाजिक समस्येची उकल करून शोध प्रबंधाच्या माध्यमातून व्हावी. याकरिता संशोधकाला विषय निवड करावी लागते. जून्या ज्ञानाचे परिक्षण, नविन ज्ञान प्राप्त करणे, विषयाची पुर्ण माहिती मिळविणे, असलेल्या ज्ञानाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी संशोधन करायचे असते. तसेच अनुभवास आलेले नविन तथ्य मांडायची असतात. विषयाचे नांवः आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजात सामाजिक आर्थिक बदलांचा अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा, कारण आरक्षणाची संकल्पना समाजात रूजली का? आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजात सामाजिक, आर्थिक बदल झाला का? आरक्षण धोरण हे सामाजिक विकासासाठी महत्वाचे ठरते का? आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी बौध्द समाजासाठी फायद्याची ठरते का? आरक्षण धोरण खरचं प्रगतीचा मार्ग आहे का? आरक्षण धोरणाची सध्यस्थिती काय? बौध्द समाजाचे संख्यात्मक व गुणात्मक परिस्थीतीचा अभ्यास त्यांचे समाजातील स्थान यांचा अभ्यास करून यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने एक प्रयत्न म्हणून या अभ्यास विषयाची निवड करण्यात आली.

संशोधनाचे महत्वः-

आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजात सामाजिक आर्थिक बदलांचा अभ्यास याबद्दल आता पर्यंत पुरेसे संशोधन कार्य झाले नाही. हे संशोधन कार्य पूर्ण झाल्यास बौध्द समाजाची आरक्षणामुळे सामाजिक व आर्थिक प्रगती किती झाली याचा उलगडा होईल. शासनाला योग्य धोरण आखण्यास मदत होईल. नवसंशोधकाला या संशोधनाचा कमीअधिक प्रमाणात मदत होईल.

संशोधनाचे उद्देशः-

१) आरक्षण धोरण या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२) आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजातील सामाजिक बदल अभ्यासणे.

३) आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजातील आर्थिक बदल अभ्यासणे.

४) आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजातील शैक्षणिक बदल अभ्यासणे.

५) आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजातील सांस्कृतिक बदल अभ्यासणे.

६) आरक्षणाचा लाभ घेत असतांना बौध्द समाजाला येणा-या समस्यांचा अभ्यास करणे.

संशोधन प्रश्नः-

१) आरक्षणाची संकल्पना समाजात रूजली का?

२) आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजात सामाजिक आर्थिक बदल झाला का?

३) आरक्षण धोरण हे सामाजिक प्रगतीसाठी महत्वाचे ठरते का?

४) आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी बौध्द समाजासाठी फायद्याची ठरते का?

५) आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजात सांस्कृतिक बदल झाला का?

६) आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजातील मागासलेपण कमी करण्यास मदत झाली का?

संशोधन पध्दतः-

नमुना निवडः- व्याख्या- एका पुर्वनिर्धारित योजनेनूसार एककांच्या एका समुहामधून एक निश्चित प्रतिशत निवडणे म्हणजे नमुना निवड होय.

प्रस्तुत संशोधन कार्य हे शास्त्रशुध्द पध्दतीने व वेळेत अभ्यासावे हा उद्देश आहे. यासाठी नमुना निवडुन त्याद्वारे अभ्यास केला जाईल. त्याद्वारे लोकांची माहिती मिळविण्यासाठी गैर संभाव्यता

नमुना निवड पध्दतीतील सोयीस्कर किंवा सुविधाजनक नमुना निवड पध्दत या तंत्राचा वापर केला जाईल. या नमुना निवड पध्दतीमध्ये संशोधनकर्ता आपल्या सोयीनुसार नमुन्याची निवड करतो. संशोधन करतांना नमुन्यासाठी किती एककाची आवश्यकता आहे, हे लक्षात घेवून नमुन्याची संख्या निश्चित केली जाते आणि त्यानुसार संशोधनकर्ता आपल्या सोयीनुसार नमुना निवडतो. नांदेड जिल्ह्यातील सोळा तालुक्यांपैकी नांदेड, नायगांव, बिलोली, देगलूर, अर्धापूर, या पाच तालुक्यांतून प्रत्येकी पाच गावांतून १२ लोकांची निवड करण्यात येईल. असे एकुण २५ गावांमधून ३०० बौध्द समाजातील लोकांची निवड करण्यात येणार आहे. त्यांचीही निवड सोयीस्कर नमुना निवड पध्दतीद्वारे केली जाईल.

संशोधन आराखडा:-

व्याख्या- निर्णय क्रियान्वीत स्थिती येण्यापूर्वीच निर्णय निर्धारीत करण्याच्या प्रक्रियेला संशोधन आराखडा म्हणतात. प्रस्तूत अध्ययन हे वर्णनात्मक आहे. कारण आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजाची सद्यस्थिती काय आहे, या बाबत परिचय करून घ्यावयाचा आहे. त्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा महत्वाचा ठरतो. कारण यामध्ये समुह समाज घटना कोणतीही समस्या कोणत्याही विषयांच्या वास्तविक तथ्यांचे वैशिष्ठे म्हणजे वर्णनात्मक विवेचन वर्णनात्मक संशोधन आराखड्यात केले जाते. संशोधन म्हणजे प्रचलित तथ्यांचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण आणि मुल्यांकन होय. पस्तूत संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरला जाईल.

साहित्य परिक्षण:-

गायकवाड (२०१३):- मागासवर्गीयांचे आरक्षण अनुसूचित जातींसाठी १३ टक्के आहे. त्यात महाराष्ट्रात ५९ जातींचा समावेश होतो. आरक्षणामुळे अनुसूचित जातींतील नौक-यांमधील प्रमाण कसे आहे, आरक्षणाचा इतिहास या पुस्तकात सविस्तर मांडणी केलेली आहे. विशेषत: अनुसूचित जातींतील नौकरी विषयक आरक्षणाची संपूर्ण माहिती देणारे हे पुस्तक आहे.उपरोक्त अध्ययन विषयाशी संकल्पना जुळवून अभ्यास करण्याचा प्रयत्न असणार आहे.

बार्टी (२०१६):- आरक्षण धोरण पुस्तकात महाराष्ट्रातील अनुसूचीत जातींसाठी असलेले १३ टक्के आरक्षण आणि मागासवर्गीयांसाठी भरती व पदोन्नतीमध्ये असलेले आरक्षण धोरण आणि त्या संबंधीत महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले महत्वाचे शासन निर्णय व परिपत्रके तसेच अनुसूचित जातींसाठी सामाजिक, आर्थिक, शैक्षणीक योजनांची माहिती या पुस्तकात आहे. आरक्षण धोरण या पुस्तकाच्या माध्यमातून मागासवर्गीयांसाठी असलेल्या विविध विकासाच्या योजना यावर सविस्तर माहिती आहे. आरक्षणाच्या माध्यमातून अनुसूचित जाती खरचं शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकास करून घेतात का? याची सखोल मांडणी या पुस्तकात केली आहे.

लक्षटे (२०१७):- आरक्षण धोरण आणि सामाजिक न्याय या लेखातून त्यांनी भारतात आरक्षण का? आरक्षण हा गरीबी हटावचा कार्यक्रम आहे का? सामाजिक न्यायाचा आरक्षण हा प्रशासन व राजकारणातील प्रवेशाची वाट सुखकर करणारा मार्ग आहे का? आरक्षणामुळे सामाजिक न्याय मिळतो का? वेगवेगळ्या सामाजिक समस्यांवर त्यांनी या लेखात मांडणी करून आरक्षण सामाजिक विकासासाठी सर्वसमावेशक एक साधन आहे. परंतू चिरकालीन किंवा शाश्वत मार्ग नाही असा निश्कर्ष त्यांनी काढला आहे. उपरोक्त अध्ययन विषयाशी जुळवून घेवून अभ्यास करण्याचा प्रयत्न असणार आहे.

काळे व गायकवाड (२०१३):- आरक्षण या पुस्तकामध्ये आरक्षणामुळे मागासवर्गीयांच्या जीवनात होणारे बदल ज्यात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय पुर्वी कसे होते, आणि आरक्षणाचा लाभ भेटल्यानंतर कसे आहेत? यावर प्रश्न-उत्तराच्या माध्यमातून प्रकाश टाकला आहे. प्रस्तूत साहित्याचा आढावा घेवून मी माझे पुढील संशोधन कार्य पूर्ण करणार आहे.

तथ्य संकलन पध्दती:-

व्याख्या- तथ्य म्हणजे एक अनुभवसिध्द सत्यापनीय अवलोकन होय. सामाजिक संशोधन पध्दती ही शास्त्रीय स्वरूपाची पध्दती आहे. समस्या, विषया बद्दल जिज्ञासू वृत्तीने सत्याचा शोध शास्त्रीय पध्दतीने होणे महत्वाचे लक्षण आहे. सामाजिक संशोधन करत असताना कल्पना पध्दतीचा उपयोग

केला जात नाही. तर पूर्णपणे वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केला जातो. तथ्य संकलन ही वैज्ञानिक पध्दतीची पहिली महत्वाची अट आहे. पंचज्ञानेंद्रीयांद्वारे होणारा स्थितीबोध म्हणजे तथ्य होय. सामाजिक संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात येईल.

प्राथमिक स्त्रोतः- प्रस्तूत संशोधनासाठी मुलाखत अनुसूची या तंत्राची निवड वस्तुनिष्ठ माहिती प्राप्त करण्यासाठी करण्यात येईल. मुलाखत अनुसूचीमध्ये वैयक्तिक माहिती, कौटूंबीक माहिती, दैनंदिन कार्याबद्दल दिनचर्ये बद्दल माहिती तसेच विषयासंदर्भातील विविध प्रश्नांचा समावेश करण्यात येईल. मुलाखत अनुसूची तयार करतांना बंदिस्त व मुक्त अशा दोन्हीही प्रश्नांचा समावेश करण्यात येईल. निरिक्षण, केंद्रित समुह, चर्चा, सखोल व व्यष्टी अध्ययन या तंत्राचा अवलंब तथ्य गोळा करण्यासाठी करण्यात येईल.

दुय्यम स्त्रोतः- तथ्य संकलनासाठी पुस्तके, प्रकाशीत अप्रकाशीत लेख, साप्ताहिके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या निरनिराळ्या आरक्षण विषयक माहिती स्त्रोतांचा वापर करून अभ्यास विषयाच्या संदर्भातील तथ्य गोळा करण्यासाठी करण्यात येईल. मी माझे संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी वरील दोन्हीही स्त्रोतांचा वापर करून संशोधन कार्य पूर्ण करणार आहे.

तथ्य विश्लेषण पध्दतः-

संकलित तथ्यांचे विश्लेषण एसपीएसएस (SPSS) या साफ्टवेअरद्वारे करण्यात येईल.

अपेक्षित निष्कर्षः-

आरक्षण धोरणांमुळे बौध्द समाजात सामाजिक आर्थिक बदलांचा अभ्यास करून बौध्द समाजाला आरक्षणा आगोदर काय समस्या होत्या आणि आरक्षण धोरणाचा लाभ व बौध्द समाजाची सद्यस्थिती काय आहे? याचा उलगडा होईल. या संशोधनातून आरक्षण धोरणामुळे बौध्द समाजातील झालेल्या विविध बदलांची उकल होईल.

प्रकरण योजनाः-

प्रकरण पहिलेः- प्रस्तावना, भारतातील समाज व्यवस्था संत व समाजसुधारकांचे कार्य, ब्रिटीश कालखंडातील शिक्षण व्यवस्था, आरक्षण धोरण व नौक-या, महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य, शाहू महाराजांचे आरक्षण विषयक कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आरक्षण विषयक भूमिका, भारतीय संविधानातील आरक्षण विषयक कलम

प्रकरण दुसरेः- संशोधन पध्दती व संशोधन साहित्य आढावा.

प्रकरण तिसरेः- नांदेड जिल्ह्यातील बौध्द समाजातील आरक्षण धोरणांमुळे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती.

प्रकरण चौथेः- तथ्य संकलन व विश्लेषण.

प्रकरण पाचवेः- निष्कर्ष, सारांश, संशोधन प्रश्नाची पडताळणी, समाजकार्य प्रारूप व शिफारशी.

संदर्भ ग्रंथसूचीः-

१) आंबेडकर बी. आर. (२०२२), "भारताचे संविधान", अजिंठा प्रकाशन, औरंगाबाद. पेज नं. ३, ५, ११, १२.

२) आंबेडकर बी.आर. (१९१६), "भारतातील जाती", आनंद प्रकाशन, औरंगाबाद. पेज १९.

३) आगलावे प्रदिप (२०२०), "सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे", श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर. पेज १ - ५८३.

४) गायकवाड प्रदिप (२०१३), "मागासवर्गीयांचे आरक्षण", चक्रधर प्रिंटींग प्रेस, नागपूर. पेज नं. १ - ३८४.

५) अन्नदाते स्वाती व अन्नदाते शशिकांत (२०१९), "संशोधन पध्दती", के सागर प्रकाशन, पुणे. पेज नं. १-९६.

६) माने शिवाजी ना. (२००९), "आरक्षणातून आलेले लोकप्रतिनिधी आणि त्यांची सामाजिक जबाबदारी", मुलनिवासी प्रकाशन, चातरी. पेज नं. ३३.

७) बार्टी (२०१६), "आरक्षण धोरण", बार्टी प्रकाशन, पुणे. पेज नं. ३-५९२.

८) सोमवंशी बी.सी. (२०२१),"अस्पृश्यतेचे अर्थशास्त्र", आनंद प्रकाशन,औरंगाबाद.पेज नं.३६.

९) संजीव (२०२३), "भारतात आरक्षण", विकीपीडीया संकेतस्थळ, पेज १-३४.

१०) गायकवाड व काळे (२०१३), "आरक्षण", जिजाई प्रकाशन, पुणे. पेज नं. ६-७२.

११) लक्षटे आर. बी. (२०१७), "आरक्षण धोरण आणि सामाजिक न्याय", शिवानी प्रकाशन, पुणे. पेज नं. १२४-१२६.

संशोधक

राजेश भाऊराव झगडे

(एम.एस.डब्ल्यू.नेट,सेट)

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वा.रा.ति.म.वि.नांदेड

मार्गदर्शक

डॉ. अरविंद सुदाम लोणकर

(एम.एस.डब्ल्यू.नेट, पीएच.डी,डी.बी.एम.)

एम.ए.पब्लिक ॲडमिनीस्ट्रेशन, सहा.प्रा.व

संशोधन मार्गदर्शक अखिल सर समाजकार्य

महाविद्यालय, परभणी